# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ़ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.
दूरध्वाीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फ़ॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.
ई-मेलः mercindia@mercindia.org.in
वेब-साईट- www.mercindia.org.in

## प्रसिद्धी पत्रक

### महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण)च्या वीजदरामध्ये सुधारणा (२००६-०७ करिता)

पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने त्यांच्या विद्युत ग्राहकांच्या बाबतीत याआधी दि. १ डिसेंबर २००३ पासून सुधारित वीजदर लागू केले होते. त्यानंतर, दि. ६ जून २००५ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विभाजन झाल्यावर वीज वितरणाचे कार्य महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. (महावितरण) कडे आले. महावितरण कंपनीने अर्थिक वर्ष २००४-२००५, २००५-०६ आणि २००६-०७ करिता त्यांच्या वार्षिक महसूलाच्या गरजेबाबतचा प्रस्ताव त्या त्या वर्षात न आणता फेब्रुवारी २००६ मध्ये आणि आर्थिक वर्ष २००६-०७ करिता सुधारित वीजदराचा प्रस्ताव मे २००६ मध्ये आयोगाकडे सादर केला. या प्रस्तावावर आयोगाने वीज ग्राहकांकडून तसेच सर्व संबंधितांकडून सूचना व हरकती मागविल्या तसेच राज्यात अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, पुणे आणि मुंबई येथे जाहीर सुनावण्यादेखील घेतल्या. या प्रक्रियेत ग्राहक प्रतिनिधींचा सक्रीय सहभाग होता.

२ महावितरणने प्रत्यक्षात ४३ टक्के इतकी दरवाढ प्रस्तावित केली असल्याचा निष्कर्ष या प्रस्तावाच्या छाननीनंतर सल्लागार संस्थेने आयोगाकडे सादर केलेल्या अहवालात काढला होता. ग्राहकांची मते, सूचना आणि हरकती नोंदवून घेतल्यानंतर आयोगाने २९ सप्टेंबर २००६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची आर्थिक वर्ष २००४-०५ ची वार्षिक महसूलाची गरज तसेच महावितरणची आर्थिक वर्ष

२००५-०६ आणि २००६-०७ करिता वार्षिक महसूलाची गरज त्याचप्रमाणे आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वीज दर ठरविले आहेत.

३ या आदेशाद्वारे विद्युत ग्राहकांचे विजेचे दर ठरवून देताना महावितरणच्या क्षेत्रात कमी किंमतीची, (प्रतियुनिट चार रुपयांपेक्षा कमी) तसेच महागडी, (प्रतियुनिट चार

४ रुपयांहून जास्त) वीजखरेदी करावी लागेल हे लक्षात घेऊन त्याचा बोजा न्याय्य स्वरूपात कसा वाटता येईल हे आयोगाने विचारात घेतले आहे.

४ आतापर्यंत महागड्या दराने खरेदी केलेली वीज सर्व वर्गवारीतील ग्राहकांना विकली जात होती. परिणामी, ग्रामीण भागात, जेथे जास्त भारनियमन आहे, तेथील ग्राहकांना महागड्या विजेचाही भार सोसावा लागत होता. यापुढे ग्रामीण भागात भारनियमनाचे तास जास्त असल्यामुळे तेथील ग्राहकांना महागड्या विजेच्या दराची झळ पोहोचणार नाही, तर शहरी भागात भारनियमनाचे तास कमी असल्यामुळे तेथील ग्राहकांना वाढीव वापरासाठी महागड्या विजेची किंमत मोजावी लागेल, हे विचारात घेऊन वीजदर ठरविण्यात आले आहेत. यामुळे प्रचलित वीजदरामध्ये सुमारे चार ते सहा टक्के वाढ होणार आहे.

५ आयोगाच्या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.-

१) महावितरणच्या विद्युत ग्राहकांच्या बाबतीत सुधारित वीजदर दि. १ ऑक्टोबर २००६ पासून लागू होतील आणि ते दि. ३१ मार्च २००७ पर्यंत अंमलात राहतील.

२) दारिद्र्यरेषेखालील निवासी ग्राहकांसाठी वेगळी वर्गवारी निर्माण करण्यात आली आहे. या वर्गवारीमध्ये ३० युनिटसपर्यंत मासिक वीजवापर असलेल्या

ग्राहकांचा समावेश आहे, आणि त्यांच्यासाठी प्रतियुनिट ४० पैसे हा सवलतीचा वीजदर ठरवून देण्यात आला आहे.

३) राज्यात विजेचा तुटवडा असल्याने कृषी ग्राहकांच्या बाबतीत पूर्वीप्रमाणेच भारनियमन यापुढेही अपरिहार्य आहे, हे लक्षात घेऊन कृषी ग्राहकांच्या वीजदरात आयोगाने कोणताही बदल केलेला नाही. त्यामुळे कृषी ग्राहकांचे सध्याचेच वीजदर यापुढेही लागू राहतील.

४) कृषीप्रधान क्षेत्र असलेल्या ग्रामीण भागातील १०० युनिटसपर्यंत मासिक वीजवापर असलेल्या निवासी वीजग्राहकाच्या वीजदरात २५ टक्के कपात होईल, तर शहरी भागातील मासिक १०१ ते ३०० युनिट वीज वापर असलेल्या निवासी वीजग्राहकास महागडी वीज घ्यावी लागत असूनही त्यांचे वीजदर १८ टक्क्यांनी कमी होतील. ३०० युनिटसपेक्षा जास्त वीजवापर असलेल्या ग्राहकांचे वीजदर पाच टक्क्यांनी कमी होतील.

५) १०० युनिटसपर्यंत मासिक वीजवापर असलेल्या शहरी व ग्रामीण भागातील वाणिज्यिक वीजग्राहकांचे वीजदर कमी होतील. कृषीप्रधान क्षेत्र असलेल्या ग्रामीण भागात १०१ ते २०० युनिटसपर्यंत वीजवापर असलेल्या वाणिज्यिक वीजग्राहकाचे वीजदर १० टक्क्यांनी कमी होतील. शहरी भागातील १०१ ते २०० युनिटसपर्यंत वीज वापर असलेल्या वाणिज्यिक ग्राहकाचे वीजदर ६ टक्क्यांनी कमी होतील, तर २०० युनिटच्या वर वीजवापर असलेल्या वाणिज्यिक ग्राहकांचे वीजदर ८ टक्क्यांनी कमी होतील.

६)	अखंडित प्रक्रिया उद्योगांतील ग्राहकांना अखंडित वीजपुरवठ्याची गरज असते. त्यामुळे त्यांना ४२ टक्के, तर खंडित प्रक्रिया उद्योगांना सुमारे २४ टक्के जादा महागडी वीज खरेदी करावी लागेल.

७)	विद्युत नियामक दायित्व आकार (रेग्युलेटरी लायबिलिटी चार्जेस) रद्द करण्यात आले आहेत.

८)	पॉवर फॅक्टर, त्वरित भरणा आदींवरील प्रोत्साहने आणि ठोक वीजखरेदीसारख्या बाबींवरील सवलतीचे सध्याचेच दर कायम ठेवण्यात आले आहेत.

महावितरणच्या वार्षिक महसूलाची गरज आणि दरवाढीच्या प्रस्तावावरील आयोगाचा प्रवर्तित आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या **www.mercindia.org.in** या वेबसाईटवर उतरवून घेण्याच्या (डाऊनलोड) स्वरूपात उपलब्ध आहे.

------------------------

सही/-
सचिव, मविनिआ

मुंबई,
२९ सप्टेंबर, २००६

## Annexure I: Impact of Tariff Revision

| | | | | Base Revised Tariff | | | Including Costly Power | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Monthly Consumption (in Units)** | **Connected Load(HP) / (kVA)** | **Bill as per Existing Tariff (Rs.)** | **Bill as per Revised Tariff (Rs.)** | **Increase /(Decrease) (Rs.)** | **Increase /(Decrease) %** | **Bill as per Revised Tariff (Rs.)** | **Increase /(Decrease) (Rs.)** | **Increase /(Decrease) %** |
| **Domestic (LD 1)** | | | | | | | | | |
| Below Poverty Line | 15 | | 46 | 9 | (37) | -80% | 9 | (37) | -80% |
| Consumers other than BPL | | | | | | | | | |
| 0-100 Units | 75 | | 243 | 183 | (61) | -25% | 186 | (57) | -23% |
| 101-300 Units | 150 | | 496 | 400 | (96) | -19% | 407 | (89) | -18% |
| Above 300 Units | 375 | | 1,337 | 1,248 | (89) | -7% | 1,272 | (65) | -5% |
| **Non Domestic (LD 2)** | | | | | | | | | |
| 0-100 Units | 75 | | 353 | 318 | (35) | -10% | 338 | (15) | -4% |
| 101-200 Units | 150 | | 643 | 578 | (66) | -10% | 603 | (40) | -6% |
| Above 200 Units | 260 | | 1,157 | 1,059 | (98) | -8% | 1,067 | (90) | -8% |
| **General Motive Power (LTP-G)** | | | | | | | | | |
| 0-1000 Units | 700 | 2 | 2,349 | 2,364 | 15 | 1 % | 2,560 | 211 | 9% |
| Above 1000 Units | 18,000 | 25 | 61,476 | 73,200 | 11,724 | 19% | 75,891 | 14,415 | 23% |
| **Agriculture** | | | | | | | | | |
| Zones with consumption norm < 1318 hrs/HP/annum | - | 8 | 1,125 | 1,125 | - | 0% | 1,125 | - | 0% |
| Zones with consumption norm > 1318 hrs/HP/annum | - | 8 | 1,350 | 1,350 | - | 0% | 1,350 | - | 0% |
| Agriculture Metered | 275 | 8 | 415 | 415 | - | | 415 | - | 0% |
| **HTP I** | | | | | | | | | |
| Continuous | 110,000 | 500 | 478,125 | 371,425 | (106,700) | -22% | 510,025 | 31,900 | 7% |
| Non- Continuous | 110,000 | 500 | 478,125 | 448,425 | 211,925 | -6% | 493,965 | 15,840 | 3% |